स्थायी समिती
दाखल विषय – दि. २७/४/२०२१

विषय क्रमांक :– ९२ त्वर्य

प्रभाग क्र. ३८ मधील बिबवेवाडी स.नं.६५९ पार्ट राजीव गांधीनगर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र व प्रसुतिगृह उभारणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे.यशराज ग्लोबल इन्फ्राकॉन एलएलपी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८८,६६,७२३.०० पेक्षा ०.००९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८८,६५,९२४.९९ उपलब्ध तरतुदी रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,६४,००६=७६ अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू.९,८९३=८० अधिक मटेरियल टेस्टिंग र.रू.५९,३२६=०० अधिक निविदा अटी शर्तीनुसार सिमेंट,स्टील या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/२५ दि.२३/०४/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ९३ त्वर्य

राजीव गांधी प्राणीसंग्रहालय येथील प्राण्यांच्या खाद्यासाठी फळे व भाजीपाला पुरविणे कामाचे निविदा क्र.३३०/२०१८ चे निविदादार मे.गुरूराज एंटरप्राईजेस यांचेकडून दि.०१/०८/२०२० ते ०४/०३/२०२१ अखेर घेणेत आलेल्या मालाचे र.रू. २९,५९,३१५.५० चे बिल निविदा क्र.३३०/२०१८ मधील नमुद दराने त्यांना अदा करणेस पश्चात मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/उदयान/२६ दि.२७/०४/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ९४ त्वर्य

महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत रुग्णांच्या उपचाराप्रित्यर्थ शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधी/विमा रकमेतुन शासनाच्या निर्देशानुसार खर्च करणेसाठी खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/एचएलओ/२८ दि.२७/०४/२०२१ चे पत्र.

१. महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरू रूग्णालय, डॉ.नायडु रूग्णालय, सीओईपी जम्बो कोविड सेंटर व बाणेर जंबो कोविड सेंटर येथे रूग्णांवर करण्यात येणाऱ्या उपचाराच्या अनुषंगाने संबंधीत विमा कंपनीकडून संबंधित रूग्णालयाचे बँक खात्यावर जमा होणारा निधी / विमा रक्कम ही मुख्य लेखा व वित्त विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या **महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत दाव्याने प्राप्त रक्कम RI 15 S 101** या अर्थशिर्षकावर वर्ग करणेस व त्यामधून सदर योजनेच्या शासन निर्णयात दिलेल्या निर्देशाप्रमाणे व याकामी गठित करण्यात आलेल्या समितीच्या मान्यतेने खर्च करणेस.

२. सदर योजने अंतर्गत पुणे महानगरपालिकेच्या रूग्णालयात रूग्णांवर करण्यात येणाऱ्या उपचाराच्या दाव्यापोटी संबंधीत विमा कंपनीकडून प्राप्त होणारी निधी/ विमा रकमेपैकी २५% निधी प्रतिवर्षी शासनास (वित्त विभागास) समर्पित करणेस.

३. सदर योजनेअंतर्गत प्राप्त होणारी निधी/ विमा रकमेपैकी २०% निधी प्रोत्साहन भत्ता म्हणून सदर रूग्ण सेवा पुरवणाऱ्या अधिकारी आणि कर्मचारी यांना अदा करणेबाबत शासन निर्णयात निर्देश देण्यात आलेले आहेत. परंतु या योजनेअंतर्गत पुणे महानगरपालिकेच्या रूग्णालयात रूग्णसेवा देणारे अधिकारी व कर्मचारी हे पुणे मनपाचे शेडयुल मान्य पदावर कार्यरत असल्याने त्यांना पुणे मनपाच्या अर्थशिर्षकामधून नियमानुसार वेतन व भत्ते अदा केले जात असल्याने त्यांना अलाहिदा प्रोत्साहन भत्ता देण्याची आवश्यकता नाही तथापि पुणे मनपा रूग्णालयामध्ये या योजनेअंतर्गत गरजु रूग्णांना उच्च दर्जाच्या वैद्यकिय सुविधा उपलब्ध करून देणेकरीता विविध आजारांचे खाजगी तज्ञ डॉक्टर्स यांना अधिक वेळ देण्याकरीता प्रोत्साहित करणेसाठी प्रोत्साहन भत्ता अदा करणेस.

४. सदर योजनेअंतर्गत पुणे मनपाच्या कमला नेहरू रूग्णालय, डॉ.नायडु रूग्णालय, सीओईपी जम्बो कोविड सेंटर व बाणेर जंबो कोविड सेंटर येथे दाखल होणाऱ्या रूग्णांचे उपचारापोटी संबंधित विमा कंपनीकडे सर्व आवश्यक कागदपत्रांसह विम्याचे परिपूर्ण दावे दाखल करून रूग्णनिहाय निधी / विमा रक्कम प्राप्त करून घेणेकामी मा.स्थायी समिती ठराव क्र.६९० दि.२०/१०/२०२० चे मान्यतेनुसार सर्वात कमी दर देणारे सर्व्हिस प्रोव्हायडर मे. रूबी एलीकेअर सर्व्हिसेस यांचेकडून कार्यादेशाचे दिनांकापासून २ वर्षे मुदतीकरीता काम करून घेणेस व सदर योजनेअंतर्गत संबंधीत विमा कंपनीकडून प्राप्त होणाऱ्या निधी / विमा रकमेपैकी ३% + जीएसटी त्यांना अदा करणेस.

५. सदर योजनेअंतर्गत पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरू रूग्णालय, डॉ.नायडु रूग्णालय, सीओईपी जम्बो कोविड सेंटर व बाणेर जंबो कोविड सेंटर येथे रूग्णांवर करण्यात येणाऱ्या उपचारापोटी संबंधित विमा कंपनीकडून

प्राप्त होणाऱ्या निधी / विमा रकमेपैकी ५२% निधी हा सदर शासन निर्णयात दिलेल्या निर्देशाप्रमाणे व परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेल्या बाबीस अनुसरून या योजनेअंतर्गत गठीत करण्यात आलेल्या समितीच्या मान्यतेने खालील बाबींकरीता खर्च करणेस.

१) महाराष्ट्र शासनाची महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजना पुणे महानरपालिकेच्या रूग्णालयांमध्ये राबविणे करीता पुणे मनपाचे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे अंदाज पत्रकात तरतुद उपलब्ध करण्यात आलेली नाही. परंतु शासन निर्णयातील निर्देशाप्रमाणे सदर योजनेअंतर्गत रूग्णांवर करण्यात येणाऱ्या उपचारांचे दाव्यापोटी संबंधीत विमा कंपनीकडून प्राप्त होणाऱ्या निधी / विमा रकमेतून सदरचा खर्च करणेस.

२) सदर योजनेअंतर्गत रूग्णांवर उपचार करणारे पुणे मनपाचे इतर रूग्णालयांचे मागणीप्रमाणे व कमला नेहरू रूग्णालयाने रूग्णांकरीता मागणी केलेले इम्प्लांट, मेश, औषधे व डिस्पोजेबल साहित्य इत्यादी व वेळोवेळी आवश्यक असलेले उपचाराशी निगडीत इतर बाबींची संबंधित विमा कंपनीकडून प्राप्त होणाऱ्या निधी / विमा रकमेपैकी ५२% रकमेमधून खरेदी करणेसाठी अल्प मुदतीची निविदा प्रक्रिया राबविणेस.

३) सदर योजने अंतर्गत पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरू रूग्णालय, डॉ.नायडु रूग्णालय, सीओईपी जम्बो कोविड सेंटर, बाणेर जंबो कोविड सेंटर व भविष्यात सदर योजनेत अंतर्भुत होणाऱ्या रूग्णालयांना तेथील रूग्णांवर उपचार करताना तातडीचा खर्च भागविणेसाठी विमा कंपनीकडून प्राप्त होणाऱ्या निधी / विमा रकमेपैकी ५२% रकमे मधून उपचार करणारे पुणे मनपाचे संबंधित सर्व रूग्णालयांना रक्कम रूपये १०,०००/- (अक्षरी रूपये दहा हजार फक्त) कायम तसलमात म्हणून उपलब्ध करून देणेस व त्यामधून एकावेळी जास्तीत जास्त रक्कम रूपये ५०००/- व वार्षिक रक्कम रूपये १,२०,०००/- पर्यंत खर्च करणेस.

४) सदर योजने अंतर्गत पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरू रूग्णालय, डॉ.नायडु रूग्णालय, सीओईपी जम्बो कोविड सेंटर, बाणेर जंबो कोविड सेंटर व भविष्यात सदर योजनेत अंतर्भुत होणाऱ्या रूग्णालयांना तेथील रूग्णांवर उपचार करताना पुणे मनपा प्रशासनाने याकामी नियुक्त केलेल्या संबंधित संस्थेकडून हृदय रोगाशी निगडित विविध तपासण्या व उपचार तसेच इतर रूग्णांकरीता करण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या आरोग्य तपासण्या करून घेऊन त्याबाबतची बिले आणि डायलेसिसची बिले व इतर बिले विमा कंपनीकडून प्राप्त होणाऱ्या निधी / विमा रकमेपैकी ५२% रकमेमधून संबंधित संस्थेस अदा करणेस.

५) शासन निर्णयातील परिशिष्ठ "अ" मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर योजने अंतर्गत संबंधित रूग्णालयाची आवश्यक कामे, प्राथमिकता, प्राधान्यता व निकड इत्यादीबाबत चर्चा करून संबंधित विमा कंपनीकडून प्राप्त होणारा निधी / विमा रकमेपैकी ५२% रकमेचा विनियोग करणेकरीता खालील प्रमाणे समिती गठीत करणेस.

| | | |
|---|---|---|
| १ | आरोग्य अधिकारी | अध्यक्ष |
| २ | सहाय्यक आरोग्य अधिकारी (परवाना) | सचिव |
| ३ | वैद्यकिय अधिक्षक, कमला नेहरू रूग्णालय | सह सचिव |
| ४ | मुख्य प्रशासकिय अधिकारी, कमला नेहरू रूग्णालय | सदस्य |
| ५ | एक सर्जन / स्त्री रोग / अस्थिरोग / कान नाक घसा तज्ञ / नेत्रशल्य चिकित्सक, कमला नेहरू रूग्णालय | सदस्य |
| ६ | एक फिजिशियन / बालरोग तज्ञ, कमला नेहरू रूग्णालय | सदस्य |
| ७ | उप अभियंता, बांधकाम विभाग (बांधकाम व विद्युत विषयक कामांच्या अनुषंगाने) | सदस्य |
| ८ | लेखा परिक्षक, मुख्य लेखा परिक्षक कार्यालय | सदस्य |

६. सदर योजने अंतर्गत संबंधित विमा कंपनीकडून प्राप्त होणारी निधी / विमा रकमेपैकी ५२% रकमेतून उपरोक्त क्र.५ प्रमाणे गठीत करण्यात आलेल्या समितीमार्फत समितीचे अध्यक्षांच्या मान्यतेने झालेल्या खर्चास व संबंधितांस मे. राज्य व केंद्र सरकारचे लागू असणारे विविध कर, उपकर व अन्य प्रमाणित वजावटी करून देयके अदा करणेस.

७. सदर योजनेची अंमलबजावणी करताना झालेला खर्च व अन्य बाबींची आढावा बैठक मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांचे अध्यक्षतेखाली दर ३ महिन्यांनी घेण्याचे आयोजन करणेस व सदर बैठकित त्यांनी दिलेल्या आदेशानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करणेस.

विषय क्रमांक :- ९५ त्वर्य

कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच कोविड लसीकरण या कामाकरिता एकवट वेतनावर तात्पुरत्या स्वरुपात "डाटा एन्ट्री ऑपरेटर" यांना नियुक्ती देणेबाबत खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/साप्र/३० दि.२७/०४/२०२१ चे पत्र.

१) सदर एकूण ४२ उमेदवार यांना अत्यावश्यक बाब व तातडीची गरज म्हणून महानगरपालिकेकडील आरोग्य विभागाचे कामकाजाचे सोयीसाठी ४४ दिवसांकरिता नियुक्ती देण्यात आली असून त्यास

पश्चात मन्यतेसह कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता महानगरपालिकेकडील आरोग्य विभागाचे कामकाजाचे सोयीसाठी सदर ४२ उमेदवार यांची ६ माहिन्यांसाठी प्रत्येक ४४ दिवसानंतर १ दिवस सेवाखंड देऊन मुदतवाढ देऊन नियुक्ती करणेस,

२) प्रति उमेदवार किमान वेतन रुपये १९,२५०/- अदा करणेस, सदरचा खर्च आरोग्य/ विभागाकडील ४५ दिवस कालावधीसाठी एकवट मासिक वेतनावर सेवा घेतलेल्या वैद्यकीय / निमवैद्यकीय कर्मचारी यांचे वेतन ज्या अंदाजपत्रकीय तरतुदीतून अदा केले जाते (RE17F257 कोविड-19 अंतर्गत अत्यावश्यक महसुली कामासाठी (खर्च), त्या तरतुदीतून "डाटा एन्ट्री ऑपरेटर" उमेदवारांचे दरमहा एकवट वेतन अगर उपस्थितीचे प्रमाणात वेतन आरोग्य विभागाकडून करणेस.

विषय क्रमांक :– ९६ त्वर्य

पुणे शहराचा पाणीपुरवठा लोकसंख्येच्या प्रमाणात व मापदंडाप्रमाणे होणेबाबत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमण प्रधिकरणाकडे (MWRRA )चालू असलेल्या सुनावणीबाबतचा अहवाल मा.मुख्य सभेस अवगत करुन देणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पाणीपुरवठा/३१ दि.२७/०४/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ९७ त्वर्य

Selection of system integrator for supply, installation, commissioning, operation and maintenance of artificial intelligence based decision support system on revenue sharing model या कामी निविदा मागविल्या असता आलेल्या ३ निविदांपैकी M/s. La Mere Business Pvt Ltd. यांचे दर सर्वात कमी रकमेचे असल्याने त्यांचेकडून काम करुन घेणेसाठी खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माहिती तंत्र./३२ दि.२७/०४/२०२१ चे पत्र.

१. **M/s. La Mere Business Pvt Ltd. यांना " Selection of system integrator for supply, installation, commissioning, operation and maintenance of artificial intelligence based decision support system on revenue sharing model " च्या प्रकल्प देखभाल व दुरूस्तीचे कामकाज २ वर्षे ३ महिने करणेस.**
२. **M/s. La Mere Business Pvt Ltd. यांना सदर संगणक प्रणालीचा वापर करून कर आकारणी व कर संकलन विभागाचे अतिरिक्त वाढणाऱ्या महसुलाच्या ४.७% (सर्व करांसहित) रक्कम निविदाधारकास अदा करणेस.**
३. **M/s. La Mere Business Pvt Ltd. यांना कार्यादेश देणेस.**
४. **M/s. La Mere Business Pvt Ltd. यांचेशी निविदा अटी व शर्तीनुसार करारनामा करणेस.**
५. **सदर कामासाठी होणारा खर्च खालील अर्थशिर्षकावर टाकणेस.**
६. **सदरचा खर्च खालील अर्थशिर्षकावर टाकणेस.**

**RE11N103/R9-8**
सन २०२१–२०२२
विशेष प्रकारची हिशोबी कामे कॉम्प्युटरवर करून घेणे
ईआरपी अंमलबजावणी, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट,डेटा एन्ट्री, सेवकांना प्रशिक्षण खर्च, जीआयएस, वर्क मॅनेजमेंट सिस्टम, किऑस्क व तद्नुषंगिक कामे करणे.(यादी R9)

विषय क्रमांक :– ९८ त्वर्य

लेखनिकी संवर्गातील व मीटर रिडर हुद्यावरील सेवकांनी टंकलेखन अर्हता व वर्ग १ ते ३ मधील (वाहन चालक वगळता) अधिकारी / कर्मचारी यांनी संगणक अर्हता प्रमाणपत्र धारण न केल्याने करावयाच्या कार्यवाहीबाबत मा.पृथ्वीराज सुतार यांचे दि.१३/१०/२०२० चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ६५० दि. २०/१०/२०२० ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/साप्र/३३ दि. २७/४/२०१२ ने पाठविलेला अभिप्राय

विषय क्रमांक :– ९९ त्वर्य

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क मधील तरतुदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणु प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत उद्भवलेल्या आप्तकालीन परिस्थितीमध्ये पुणे महानगरपालिकेच्या नायडु

हॉस्पीटल येथील कोव्हीड-१९ सेंटर येथे ऑक्सीजन सिलेंडर फिलींग स्टेशन उभारणी करणे व यशस्वी चाचणी देणे हे काम मे.स्पार्क इंडस्ट्रीज यांचेकडून र.रू.१९,९०,०००.०० पर्यंत कामे करून घेणेस व त्यानुसार त्यांचेशी आवश्यकतेनुसार करारनामा करणेस मान्यता देण्यात आलेली असून सदरची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विदयुत/३४ दि.२७/०४/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- १०० त्वर्य

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क मधील तरतुदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणु प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत उद्‌भवलेल्या आप्तकालीन परिस्थितीमध्ये पुणे महानगरपालिकेच्या गणेश कला क्रिडा केंद्र अथवा पुणे म.न.पा.ने सुचविलेल्या ठिकाणी कोव्हीड-१९ सेंटर येथे लिक्विड ऑक्सीजन सिलेंडर पुरविणे बसविणे व यशस्वी चाचणी देणे हे काम मे.स्पार्क इंडस्ट्रीज यांचेकडून र.रू.२,१५,०००.०० या दराने १० नग ड्युरा खरेदी करणे व तद्नुषंगिक इतर कामे करणे हे काम र.रू.२७,९०,२२८.०० पर्यंत कामे करून घेणेस व त्यानुसार त्यांचेशी आवश्यकतेनुसार करारनामा करणेस मान्यता देण्यात आलेली असून सदरची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विदयुत/३६ दि.२७/०४/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- १०१ त्वर्य

मा.सौ.मानसी देशपांडे, मा.सौ.वर्षा तापकीर व मा.सौ.सुनिता गलांडे यांचे दि.२७/४/२०२१ चे पत्र.

सध्याच्या वेगाने बदलणा-या जगात विद्यार्थ्यांना एकातरी परकीय भाषेचे ज्ञान आवश्यक झाले आहे. संपूर्ण जगाची ओळख आता ग्लोबल व्हिलेज अशी होत असून या जागतीक बदलामध्ये आपलाही सहभाग असावा या उद्देशाने पुणे महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांना परकीय भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

ही वस्तुस्थिती विचारात घेता, ग्लोबल पुणेकर या उपक्रमांतर्गत पुणे महानगरपालिका विश्वभारती इन्स्टिट्यूट फॉर फॉरेन लँग्वेजेस यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे महानगरपालिका माध्यमिक विभागाच्या विद्यानिकेतन शाळांमधील इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी जर्मन,फ्रेंच,स्पॅनिश व जॅपनिज या परकीय भाषा शिकवण्यास मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :- १०२ त्वर्य

मा.महेश वाबळे व मा.सौ.मानसी देशपांडे यांचे दि.२७/४/२०२१ चे पत्र.

श्रम स्वयंरोजगार सेवा सह.संस्था मर्यादित, स.नं.१०९१, बापुजीनगर, पदमावती वसाहत, पर्वती, पुणे ही संस्था महाराष्ट्र सरकारी अधिनियम १९६० मधील (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२४)कलम ९(१) अन्वये नोंदणीकृत झाली आहे. शासन निर्णय क्रमांक - रोस्वरो-२००२/प्र.क्र.२६७ रोस्वरो-१ अन्वये बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थांना विना निविदा कामे देणेबाबत निर्णय झालेला आहे.

तरी सदर शासन निर्णय नुसार श्रम स्वयंरोजगार सेवा सह.संस्था मर्यादित या संस्थेस पुणे महानगरपालिकेची कामे विना निविदा देणेबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :- १०३ त्वर्य

मा.पृथ्वीराज सुतार व मा.विशाल धनवडे यांचे दि.२२/४/२०२१ चे पत्र.

पुणे शहरासह संपुर्ण देशभरामध्ये कोरोनाची दुसरी लाट आली असून,अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. पुणे शहरामध्ये पॉझिटिव्ह रूग्णांनी संख्या वाढत असून, नागरिकांना खर्चाची तरतूद करताना कसरत करावी लागत आहे. तरी पुणे शहरातील नागरिकांसाठी मनपाचा मिळकत कर भरण्यासाठी ३१ मे २०२१ ऐवजी जुलै २०२१ अखेर पर्यंतची मुदतवाढ देण्यात यावी व या तारखेरपर्यंत संपूर्ण कर भरणा-यास मिळकतकरामध्ये सवलत सुद्धा देण्यात यावी.

विषय क्रमांक :- १०४ त्वर्य

मा.सौ.चाँदबी नदाफ यांचे दि.२६/४/२०२१ चे पत्र.

कोरोनाला प्रतिबंध घालण्यासाठी मागील वर्षी मार्च महिन्यामध्ये केंद्र सरकारने संचारबंदी केली होती. त्यामुळे हातावर पोट असलेल्या कष्टकऱ्यांचे जगणेच मुश्किल झाले. त्यातून कष्टकरी घटक अजूनही सावरू शकला नाही. आता

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमुळे महाराष्ट्र सरकारने संचारबंदी सदृश्य निर्बंध लागू केले आहेत. यात असंघटित कष्टकऱ्यांची पुन्हा होरपळ होणार आहे. ती थांबविण्यासाठी सर्व शासन संस्थांनी पुढाकार घेतला पाहिजे, यात केंद्र, राज्य शासना बरोबर स्थानिक स्वराज्य संस्थांनीही कष्टकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी पुढे आले पाहिजे. पुण्या शेजारच्या पिंपरी-चिंचवड मनपाने असे उदाहरण घालून दिले आहे. रिक्षाचालक, पथारी व्यावसायिक, घरकामगार, केशकर्तनकार, बसचालक यांना प्रत्येकी रु. ३००० तत्काळ देण्याची घोषणा केली आहे.
हाच धागा पकडून एक पाऊल जात पुणे महानगरपालिकेने समाजातील सर्व कष्टकरी जनतेला प्रत्येकी रू. ३००० द्यावेत आणि भारतात आदर्श घालून द्यावा, आपल्या बोधचिन्हात छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र धारण करणारी पुणे महानगरपालिका महाराजांचा कल्याणकारी वसा ही नक्की घेईल.

उपलब्ध माहिती नुसार पुणे शहरात जवळपास २३ लाख असंघटित कामगार आहेत. त्यांना प्रत्येकी रु. ३००० आर्थिक सहयोगाचा खर्च एकूण रू. ६९० कोटी पर्यंत जातो. पुणे मनपाच्या २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात पथ सुधारणा विभागाला महसुली आणि भांडवली खर्च मिळून रू. १५६८ कोटी (सेवकांवरील खर्च वगळून) दिलेले आहेत. विविध रस्त्यांचा विकास करणे, विश्रांतवाडी चौकात उड्डाणपूल, खराडी चौकात उड्डाणपूल अशी अनेक कामे प्रस्तावित आहेत. डागडुजीची कामे वगळता इतर सर्व नवीन कामे तत्काळ थांबविण्यात यावीत आणि तो पैसा कष्टकरी जनतेसाठी आर्थिक मदत म्हणून वापरण्यात यावा. याशिवाय आपणही स्वतंत्रपणे आर्थिक सहयोगासाठीच्या खर्चाबाबत पर्यायी विचार करु शकता. इतर विकास कामांपेक्षा मनुष्याचा जीव महत्वाचा आहे त्यामुळे आर्थिक तरतुदीतील बदल आवश्यक ठरतो. या घटकांना आर्थिक मदत देणे तातडीचे असल्याने या बाबत निर्णय लवकरात लवकर घ्यावा. ज्या असंघटित क्षेत्रातील समाज घटकांना आर्थिक मदतीची गरज आहे त्याची यादी सोबत जोडत आहोत.

विषय क्रमांक :- १०५ त्वर्य
मा.ॲड्.अब्दुल गफुर पठाण यांचे दि.२६/४/२०२१ चे पत्र.

मा.स्थायी समिती ठराव क्र.१२३३ दि.१६/०२/२०२१ च्या ठरावाचा फेरविचार करण्यात यावा. (बिबवेवाडी येथील सर्वे नं.६५१ ते ६५७,६२१,६२३,६२७,५५६,६२६,६२० सदरच्या ठिकाणी अनेक अनाधिकृत पत्र्याचे शेड असून या परिसरात मंगलकार्यालय व लॉन सुरू आहे. या सर्व मिळकत धारकांनी मोठी गोडावुन बांधुन याचा वापर व्यवसायासाठी केलेला आहे. गेली अनेक वर्ष सदर जमीनींचा व मिळकतीचा वापर व्यवसायासाठी संबंधितांकडून केला जात आहे तसेच कर आकारणी करताना प्रत्यक्ष क्षेत्रांऐवजी कमी क्षेत्रावर करण्यात आलेली आहे. पुणे मनपाने या सर्व भागातील अनाधिकृत मिळकतींना २६७ प्रमाणे मिळकत कर लावला आहे. सदर लावण्यात आलेला मिळकत कर कायम ठेवण्यात यावा.)

शिवाजी दौंडकर
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.